जा.क्र.माध्य-३/(१४)/नमाशा/परिआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.१.
यांचे कार्यालय.
दिनांक :- 20/9/83

प्रति,

सेक्रेटरी,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

विषय :- ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या "निगडी" जि.पुणे या माध्यमिक शाळेत मराठी माध्यमाचे समांतर वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

महाशय,

उपरोक्त विषयाचे शासनाचे क्र.एसएसएन-१३८२/३२०५७/(६६९१-एन) माशि-१, दिनांक १ सप्टेंबर,८३ च्या पत्रानुसार "ज्ञानप्रबोधिनी" या संस्थेतर्फे सुरु असलेल्या "निगडी" जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत मराठी माध्यमाचे इयत्ता ५ वी व ८ वी चे समांतर वर्ग कायम विना अनुदान तत्वावर पूर्वलक्षी प्रभावाने जून,१९८२ पासून सुरु करण्यास नेहमीच्या अटीवर ( कृपया शिक्षण संचालकांचे क्रमांक अमाशा/१०८०/३९४०४-१५-क, दि.२४.७.८० चे पत्र विचारात घ्यावे ) तसेच विशेषत: खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

अ) संस्थेने, इंग्रजी व मराठी माध्यमाच्या वर्गासाठी मुख्याध्यापक वगळून वेगवेगळ्या स्वतंत्र शिक्षक वृंदाची व इतर शिक्षकेतर कर्मचा-यांची नेमणूक केली पाहिजे.

ब) मराठीच्या समांतर वर्गासाठी वेगळी वर्ग व्यवस्था असली पाहिजे.

क) संस्थेने, मराठी माध्यमाच्या समांतर वर्गासाठी आवश्यक ती जागा, फर्निचर व इतर शैक्षणिक बाबींची पूर्तता केली पाहिजे.

ड) संस्थेने मराठी माध्यमांच्या समांतर वर्गाच्या दृष्टीने होणारा सर्वतोपरी व्यवहार ( आर्थिक बाबीसह) शक्यतो स्वतंत्र वेगळा ठेवावा.

फ) या मराठी माध्यमाच्या समांतर वर्गासाठी भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान तसेच कमी उत्पन्न गटातील पालकांच्या मुलांना मिळणाऱ्या फी सवलतीचा परतावा देण्यात येणार नाही.

१) संस्थेची आर्थिक स्थिती चांगली आहे याची खात्री संस्थेकडून शासनाकडे अनुदानाची मागणी न करण्याची लेखी हमी घेण्यात यावी व त्यावर संस्थेच्या अध्यक्षांची व जबाबदार पदाधिकारी यांच्या सह्या घेऊन ते हमी पत्र शिक्षणाधिका-यांच्या कायम स्वरुपात जतन करुन ठेवण्यात यावे

२) संस्थेने याबाबत वेळोवेळी निघणा-या शासकीय आदेशाचे (उदा. विद्यार्थ्यांचे प्रवेशाबाबत)काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

कृपया या पत्राची पोहोच द्यावी.

सही/-
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे करिता

मूळ प्रतीवर शिक्षण उप-संचालक यांची स्वाक्षरी आहे.

एसजी/-

को.ना.अ.
भाद्र.२९, २०३९

प्रत :- शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे माहितीसाठी रवाना त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी १५ दिवसाचे आंत त्या शाळेला भेट देऊन वरील अटींची पूर्तता केली आहे किंवा नाही याचा अहवाल तसेच शाळेचा तपासणी अहवाल या कार्यालय सादर करावा व याबाबत विलंब झाल्यास शाळेची मान्यता चालू ठेवणे ~~व पुढे अनुदान देणे~~ यास विलंब होईल याची नोंद घेऊन त्वरित कार्यवाही करावी.

प्रत :- मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.32 यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रत :- मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

....